दिनांक : २२/१०/२०२४
बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

# प्रेस नोट

बृहन्मुंबई शहरात मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती यांचे निर्देशानुसार, मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.) श्री. सत्य नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलीपदार्थ विरोधी कायद्यान्वये विशेष मोहिम राबवून कारवाई करण्यात येत असते.

तद्नुसार आर.सी.एफ पोलीस ठाणे अभिलेखावरील अंमलीपदार्थाची तस्करी करणारा इसम नामे मोहम्मद इकलाख बशीर शेख उर्फ मोहम्मद इकलाख मोहम्मद ईस्माईल शेख उर्फ मुसा उर्फ सलमान उर्फ अकलाख, वय ३२ वर्षे याच्याविरुध्द मुंबई शहरात अंमलीपदार्थ तस्करीचे एकूण ०७ गुन्हे दाखल होते. सदरबाबत आर.सी.एफ. पोलीस ठाणेकडून नमूद इसमास स्थानबध्द करण्याकरीता मा. शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार दि. १५/१०/२०२४ रोजी मा. स्थानबध्द अधिकारी तथा प्रधान सचिव (अपील व सुरक्षा), गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी नमूद इसमाविरुध्द PITNDPS ACT 1988 अन्वये स्थानबध्द करण्याचे आदेश पारित केल्याने नमूद स्थानबध्द इसमास दि. १६/१०/२०२४ रोजी स्थानबध्द आदेशाची बजावणी करून त्यास दि. १७/१०/२०२४ रोजी सुरक्षितरित्या मध्यवती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे जमा करण्यात आले आहे. PITNDPS ACT 1988 अन्वये स्थानबध्द करण्याची कारवाई ही मुंबई पोलीस आयुक्तालयातील पहिलीच कारवाई आहे.

सदरची कामगिरी तत्कालीन अपर पोलीस आयुक्त (पुर्व प्रादेशिक विभाग) श्री. विनायक देशमुख, अपर पोलीस आयक्त (पुर्व प्रादेशिक विभाग) श्री. महेश पाटील, तत्कालीन पोलीस उप आयुक्त (परिमंडळ -६) श्री. हेमराजसिंह राजपूत, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-६) श्री. नवनाथ ढवळे, तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त (ट्रॉम्बे विभाग) सुहास हेमाडे, तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक (आर.सी.एफ. पोलीस ठाणे) केदारी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आर.सी.एफ. पोलीस ठाणेचे तडीपार अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक रविंद्र पाटील व त्यांच्या पथकाने पार पाडली आहे.

बृहन्मुंबई शहरातील जनतेला आवाहन करण्यात येते की, अंमलीपदार्थ विक्री, सेवन किंवा वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत कार्यवाहीकरीता संबंधित पोलीस ठाणे तसेच बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंमलीपदार्थ विरोधी पथकाच्या ९८१९१११२२२ या हेल्पलाईन क्रमांकावर आणि मुख्य नियंत्रण कक्षातील १०० व ११२ तसेच ०२२-२२६४१७५२ या हेल्पलाईन क्रमांकावर माहिती दयावी.

* * *